९०५ ~~९०७~~ ~~९६९~~ ~~८६५~~ ~~२२९~~

सिडकोने धारण केलेल्या जमिनीवर अकृषिक आकारणी करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. एनएए-४२८२/३०१४६५/[५७]/ल-५
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २८ सप्टेंबर, १९९५.

पहा : १] शा.प.समक्रमांक दि. २६/९/१९८३
२] शा.प.समक्रमांक दि. १७/७/१९८७.

शासन निर्णय :-

सिडकोने धारण केलेल्या जमिनीवर अकृषिक आकारणी करण्याबाबतचा प्रश्न यापूर्वी उपस्थित झाला होता. या प्रश्नाबाबत नगर विकास विभाग व वित्त विभाग यांचेशी विचार विनिमय करुन व त्या विभागाच्या अनुमतीने सिडकोने धारण केलेल्या जमिनीवर अकृषिक आकारणी करावी असे शासन पत्र समक्रमांक दि. २६/९/१९८३ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिका-यांना आदेश देण्यात आले होते. तथापि सिडकोने अकृषिक आकारणीबाबत काही मुद्दे उपस्थित करुन शासनाकडे निवेदन देऊन अकृषिक आकारणीची वसुली न करण्याबाबत विनंती केल्यामुळे सिडकोने उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अकृषिक आकारणीच्या वसुलीबाबत आग्रह धरु नये, अशा सूचना संबंधित जिल्हाधिका-यांना शासन पत्र समक्रमांक दि. १७/७/८७ अन्वये देण्यात आल्या होत्या. सिडकोने उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात आला असून सिडकोने धारण केलेल्या जमिनीवर अकृषिक आकारणी करणे कायदेशीर होईल असे स्पष्ट केले आहे.

२. त्या अनुषंगाने शासन आता असे आदेश देत आहे की, सिडकोने धारण केलेल्या जमिनीवर अकृषिक कराची आकारणी करावी. सदरहू अकृषिक कराची आकारणी शासन समक्रमांकाचे पत्र दि. २६/९/१९८३ मध्ये नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे करण्यात यावी. त्याचप्रमाणे शासन समक्रमांकाचे परिपत्रक, दि. १७/७/१९८७ रोजी याबाबत देण्यात आलेले स्थगिती आदेश या शासन निर्णयान्वये शासन रद्द करीत आहे.

३. अकृषिक कराची तात्काळ वसूली करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
महसूल
11 OCT 1995

(स्वाक्षरी)
[ रा. सो. स्वर्गीया ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
व. लि. लि., उ. जि. जिल्हाधिकारी